# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट-२९३/२०२२** **दिनांक : ०२/१०/२०२२**

**बाधकाम व्यावसाईकास खंडीणीची धमकी देणाऱ्या दोन आरोपीतांना गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा व मध्यवर्ती गुन्हे शाखा यांच्याकडून जेरबंद करुन गुन्हा उघकीस आणण्यात यश.**

दिनांक ३०/०९/२०२२ रोजी ११.५५ वा चे सूमारास भैरव सृष्टीं बिल्डिंग शॉप नं ०१ तळमजला १५० फूट रोड भाईंदर प. येथील बांधकाम व्यावसाईकास सराईत गुन्हेगार रवि पूजारी याने दोन अनोळखी इसम यांचे कडुन तक्रारदार यांना चिठीव्दारे जिवे ठार मारण्याची धमकी देवून, ५० लाख रुपयाची खंडणी म्हणून मागणी केली होती तसे न केल्यास तक्रारदार यांना व त्यांचा मूलगा याला देखील जिवे ठार मारण्याची धमकी दिली. सदरबाबत **भाईंदर पोलीस ठाण्यात गु.रजि.क्र. ४७८/२०२२ भा. द वि स कलम ३८७,३४ प्रमाणे** गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा घडल्याची माहिती मिळालेनंतर सदर गुन्हयाचे तपासा संबधाने वरिष्ठ अधिकारी यांनी विषेश सुचना दिल्या त्या अनुशंगाने सहा. पो. आयुक्त गुन्हे, तसेच गुन्हे शाखा कक्ष-०१, काशिमीरा व मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार असे तात्काळ गुन्हा घडले ठिकाणी हजर झाले. सहा. पो. आयुक्त गुन्हे, यांनी सदर ठिकाणाची पाहणी करुन गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांची एकूण ०३ पथके तयार करुन गुन्हयांचे तपासाबाबत सुचना दिल्या.

त्यानुसार गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार याची पथके तयार करुन त्यांना तपासा बाबतच्या सुचना देऊन रवाना केले. त्यानुसार सदर पथकाला महत्वाचे धागेदोरे मिळाले. सदर मिळालेल्या माहीती वरुन आरोपीत नामे १)मोहम्मद इक्बाल मोहम्मद अली शेख, वय-४९ वर्षे, धंदा-ईस्टेट एजंट, रा. सलमा मंजील, चिमटपाडा, मरोळनाका, अंधेरी पूर्व. मुंबई-५९ २) लॉरेन्स लिओ चेट्टीयार रा. ई-२, गजानन सोसायटी, ९० फुट रोड, साकीनाका अंधेरी पूर्व मुंबई-७२ यांना कशेळे, ता. कर्जत जिल्हा रायगड येथुन ताब्यात घेण्यात आले आहे. सदर गुन्हयांचा पुढील तपास मध्यवर्ती गुन्हे शाखा करीत आहे.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) अति. कार्यभार गुन्हे, श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे),यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. अविराज कुराडे, पोलीस निरीक्षक राहुल राख सहा.पो.निरी. कैलास टोकले, सहा.पो.निरी. पुष्पराज सुर्वे, सहा.पो.निरी. नितीन बेंद्रे सहा.पो.निरी. दत्तात्रय सरक, पो.उप-निरी. हितेंद्र विचारे, श्रेणी उप.-निरी चंद्रकांत पोशिरकर, सहा.फौज. राजु तांबे, सहा.फौज. संदीप शिंदे, सहा. फौज. किशोर वाडिले, पो.हवा./संजय पाटील, पोहवा/अविनाश गर्जे, पो.हवा./संजय शिंदे, पोहवा/संतोष लांडगे, पोहवा/पुष्पेंद्र थापा, पोहवा/सचिन सावंत, पो.हवा./ विजय गायकवाड, पोहवा/मुस्तकीम पठाण, पो.हवा/राजवीर संधू, पो.हवा/गोवीद केंद्रे, पो.हवा./शिवाजी पाटील, पो.ना./राजाराम काळे, पो.अंम./प्रशांत विसपुते पो.अंम/विकास राजपुत, पो.अंम./समिर यादव, पो.अंम/महेश वेल्हे, पो.अंम/सुशिल पवार, पोअंम./अनिल नागरे, पो.अंम/जयकुमार

राठोड असे गुन्हे प्रकटीकरण शाखा-१ व मध्यवर्ती गुन्हे शाखाचे अधिकारी व अंमलदार तसेच सहा.फौज/ संतोष चव्हाण नेम. सायबर सेल यांनी पार पाडली आहे.